यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या संस्थेतील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत सहायक प्राध्यापक (कायदा) व (लोकप्रशासन) या पदांची वेतनश्रेणी उन्नत करुन प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्र.प्रतिनि २०२६/प्र.क्र.५७/प्रशि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० नोव्हेंबर, २०२६.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही -२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दि.१७.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दि.१६.०२.२०१८.
३) शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र.बदली २०२६/प्र.क्र.७१/आस्था-१, (ई-ऑफिस क्र.१६२७२०५) दि.१५.०५.२०२६
४) शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र. बदली २०२६/प्र.क्र.५१/आस्था-१, (ई-ऑफिस क्र.१६१९२९६) दि.१५.०५.२०२६
५) महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. प्रतिनि-२०२६/प्र.क्र.१९/आस्था-१, दि.२१.०९.२०२६
६) महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. प्रतिनि-२०२६/प्र.क्र.२०/आस्था-१, (ई-१६०४८८०)दि.२१.०९.२०२६

शासन आदेश :-

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या प्रशिक्षण संस्थेतील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत रिक्त असलेल्या सहायक प्राध्यापक गट-अ या पदावर सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने संदर्भाधीन क्र.०३ व ०४ च्या शासन आदेशांन्वये श्रीमती रेश्मा राजेश माळी, अपर जिल्हाधिकारी (नि.श्रे.)तसेच श्रीमती शमा ढोक-पवार, अपर जिल्हाधिकारी यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन श्रीमती माळी व श्रीमती पवार दि.१९.०५.२०२६ (म.पु) रोजी अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे रुजू झाल्या आहेत.

२. सबब यशदा संस्थेतील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत रिक्त असलेल्या सहायक प्राध्यापक (कायदा) या पदावर श्रीमती रेश्मा राजेश माळी, अपर जिल्हाधिकारी (नि.श्रे.) यांची तसेच सहायक प्राध्यापक (लोकप्रशासन) या पदावर श्रीमती शमा सुशिलकुमार ढोक-पवार, अपर जिल्हाधिकारी यांची खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास प्रस्तुत शासन आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव/पदनाम/वेतनश्रेणी	मुळ प्रशासकीय विभाग	प्रतिनियुक्तीचे पद/ वेतनश्रेणी	प्रतिनियुक्तीचा दिनांक	प्रतिनियुक्तीचा कालावधी
१	श्रीमती रेश्मा राजेश माळी, अपर जिल्हाधिकारी (नि.श्रे.) एस-२७: १२३१००-२१५९००	महसूल व वन विभाग	सहायक प्राध्यापक (कायदा) एस -२३ : ६७७००-२०८७००	दि.१९.०५.२०२६ पासून	०३ वर्षे
२	श्रीमती शमा सुशिलकुमार ढोक-पवार, अपर जिल्हाधिकारी एस-२५ : ७८८००-२०९२००	महसूल व वन विभाग	सहायक प्राध्यापक (लोकप्रशासन) एस -२३ : ६७७००-२०८७००	दि.१९.०५.२०२६ पासून	०३ वर्षे

३. वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या संस्थेतील एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सहायक प्राध्यापक वर्ग-१(कायदा)(गट-अ)[एस-२३-६७७००-२०८७००] पदाची वेतनश्रेणी उन्नत करुन एस-२७: १२३१००-२१५९०० सहायक प्राध्यापक (लोकप्रशासन) (गट-अ)[एस-२३-६७७००-२०८७००]या पदाची वेतनश्रेणी उन्नत करुन एस-२५ : ७८८००-२०९२०० अशी करण्यात येत आहे.

४. सदर उन्नत केलेले सहायक प्राध्यापक वर्ग-१ (कायदा))[एस-२३-६७७००-२०८७००] हे पद श्रीमती रेश्मा माळी सदर पदावर कार्यरत असेपर्यंत तसेच सहायक प्राध्यापक वर्ग-१ (लोकप्रशासन))[एस-२३-६७७००-२०८७००] हे पद श्रीमती ढोक-पवार ह्या सदर पदावर कार्यरत असेपर्यंतच अस्तित्वात राहिल. त्यानंतर सदर सहायक प्राध्यापक (कायदा) व सहायक प्राध्यापक (लोकप्रशासन) ही दोन्ही पदे आपोआप मूळ वेतनश्रेणीत अवनत होतील.

५. सदर प्रतिनियुक्ती महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट-२ मधील खालील अटी व शर्तींच्या अधीन राहील. :-

१) प्रस्तुत प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी संबंधित विभागास लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने सेवेची आवश्यकता वाटल्यास सदर अधिकाऱ्यास परत बोलविण्यात येईल. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेस वरील अधिकाऱ्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास संबंधितांना ३ महिन्याची नोटीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे शासनास सदर बाब अवगत करण्यात यावी.

२) प्रतिनियुक्तीवर असतानाच्या कालावधीतील वेतनाचा/रजा वेतनाचा खर्च यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या संस्थेने करावा.

३) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा....) नियम १९८१ च्या परिशिष्ट-४ मध्ये विहित केलेल्या दरानुसार यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पुणे या संस्थेकडून रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान देण्यात यावे.

४) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीमधील वर्गणी चालू ठेवण्यात यावी.

५) संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करावयाची झाल्यास त्यांच्या सेवा मूळ विभागाकडे परत करण्यात याव्यात.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.३९२(१)/सेवा-९/२०२६,दि.०५.११.२०२६अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६११२०१७३४२४४१०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANUSHRI ARVIND PARAB

Digitally signed by ANUSHRI ARVIND PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=9CD457C3499803413F595E2A9672ABFE873725FE8CEA5F909D2E30A578CDB448, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9411487BD726F28FA97FD6789383FFB6B7167B44B2A0A517BD03DE3D9C87038, cn=ANUSHRI ARVIND PARAB
Date: 2026.11.20 17:35:54 +05'30'

(अनुश्री परब)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, :-

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपूर

२. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
३. अ.मु.स.(महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, पुणे
५. उपसचिव (आस्था-१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
७. लेखाधिकारी, यशदा, पुणे
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९. श्रीमती रेश्मा राजेश माळी, अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी),
१०. श्रीमती शमा सुशिलकुमार ढोक-पवार, अपर जिल्हाधिकारी
११. निवडनस्ती सा.प्र.वि./प्रशि-४.